फौ.कि.अ.क्र. ३२/२०२६

प्रेमदास..वि..सरकार

MHWS090004742026

:: नि.क्र. ०१ वरील आदेश ::

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार प्रेमदास किसन जाधव यांनी पोलिस स्टेशन मानोरा ता.मानोरा, जि.वाशिम यांच्याकडील गुन्हा क्र.१५३/२०२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चे कमल १२–अ मधील जप्त मुद्देमाल म्हणजेच Oppo A9 2020 कंपनीचा मोबाईल आय. एम. इ. आय. नं. ८६५९३१०४९८३१७७९ व ८६५९३१०४९८३१७६१ परत मिळणेसाठी केला आहे.

२. यासंदर्भात तपास अधिकारी व सरकारी वकिलांचे म्हणणे मागविण्यात आले. सरकारी वकिलांनी सदर अर्जास विरोध केला आहे. त्यांचे म्हणणेप्रमाणे सदर गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा दखलपात्र असून सदर मोबाईल महत्वाचा पुरावा आहे. अर्जदाराने मोबाईल संबंधी मुळ कागदपत्र दाखल केलेले नाही. सदर मोबाईलचा रंग, स्वरुप, ओळख बदल करण्याची दाट शक्यता आहे. सदर मोबाईल विक्री किंवा इतर प्रकारे विल्हेवाट करण्याची दाट शक्यता आहे. तसेच अर्जदार आवश्यकता असल्यास मोबाईल हजर करणार नाही. सदर मोबाईलचे पुन्हा गुन्ह्याकरीता वापर करण्याची दाट शक्यता असल्यामुळे अर्जदारास सदरचे मोबाईल सुपुर्तनाम्यावर देण्यास आक्षेप नोंदविला आहे. तसेच तपास अधिकारी यांनी नि.५ वर सरकारी वकिलांनी दिलेल्या म्हणण्याप्रमाणेच त्यांचे देखील म्हणणे दिले आहे. त्यात त्यांनी सदर अर्जावर योग्य तो आदेश होण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदाराने दस्त यादी नि.३ सोबत प्रथम खबर अहवालाची छायांकित प्रत, मोबाईलची संगणीकृत प्रत व अर्जदाराचे आधारकार्डची छायांकित प्रत असे कागदपत्र दाखल केलेले आहेत. सदर मोबाईल संबंधित कागदपत्रावरुन जप्त मोबाईल हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

४. तसेच अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदाराच्या व्यतिरीक्त सदर मोबाईल परत मिळण्यासाठी इतर कुणीही अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे

अर्जदाराचा मोबाईल मालकी निर्विवाद आहे. वास्तविक, खटल्याच्या निकालास बराच विलंब लागण्याची शक्यता विचारात घेता सदर जप्त मोबाईलचा ताबा अर्जदाराला देणे योग्य होईल. सदर जप्त मुद्देमाल हे मशिनरी असल्यामुळे पडुन राहिले तर ते खराब होण्याची किंवा गंजण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जप्त मुद्देमालाचा तात्पुरता ताबा अर्जदाराला देणे नाकारता येणार नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **'सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार (२००२ (३) एस.सी.सी.२८३)** या खटल्यातील निर्देशानुसार अशा प्रकारच्या जप्त मुद्देमालाची लवकरात लवकर विल्हेवाट लावण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सदरचा जप्त मुद्देमाल अर्जदार यांना योग्य ते बंधपत्र घेवून तसेच योग्य त्या अटी शर्तीनुसार परत करणे न्यायोचित ठरेल. त्यामुळेच खालील अटी शर्तींच्या अधिन राहुन अर्ज मंजुर करण्याजोगा आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. पोलिस स्टेशन, मानोरा ता.मानोरा जि.वाशिम अंतर्गत नोंद गुन्हा क्र.१५३/२०२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चे कमल १२–अ मधील जप्त मुद्देमाल म्हणजेच Oppo A9 2020 कंपनीचा मोबाईल आय. एम. इ. आय. नं. ८६५९३१०४९८३१७७९ व ८६५९३१०४९८३१७६१ चा अंतरीम ताबा रु.१६,०००/– (रुपये सोळा हजार फक्त) च्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अर्जदार नामे **प्रेमदास किसन जाधव**, रा.शेंदूरजना अ., ता.मानोरा, जि.वाशिम यांना खालील अटी शर्तींच्या आधारे देण्यात यावा.

अ) अर्जदार याने न्यायालयाच्या परवानगीशिवाय किंवा खटला निकाली निघे पावेतो सदर मोबाईलची कोणत्याही प्रकारची विक्री किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये. तसेच सदर मोबाईलचा रंग किंवा इतर प्रकारे कोणत्याही प्रकारचा फेरबदल करु नये.

ब) अर्जदार याने सदर मोबाईलची आवश्यकता असेल तेंव्हा न्यायालयासमोर हजर करावे.

क) तपास अधिकारी यांनी जप्त मोबाईलचा ताबा अर्जदार यांना देतांना अर्जदाराच्या खर्चाने जप्त मोबाईलचे छायाचित्रे काढून व योग्य तो पंचनामा तयार करुन अर्जदाराला ताबा द्यावा. त्यानंतर तपास अधिकारी यांनी प्रस्तुतचा सुपुर्तनाम्याचा अहवाल, छायाचित्रे, पंचनामा व उपरोक्त क्षतीपुर्ती बंधपत्र दोषारोपपत्रासोबत न्यायालयात दाखल करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.06.09 15:48:02 +0530

मानोरा					(ज. तु. कोरेगांवकर )
दि. ०९.०६.२०२६				न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.)
(न्यायालय क्र.१.), मानोरा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt. R. K. Chavhan(L.G.) |
| Court Name | :- | Shri. J. T. Koregaonkar<br>(Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Manora. Dist. Washim. |
| Date | :- | 09/06/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 09/06/2026 |
| Order uploaded on | :- | 09/06/2026 |